चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

११ सप्टेंबर, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

# गणेश विसर्जन मिरवणुकीकरीता पोलीस दल सज्ज

दिनांक ११/०९/२०१९ रोजी चंद्रपुर येथील श्री. गणेश विसर्जन मिरवणुक शहरातील मुख्य रस्त्यावरून निघणार असुन सदर मिरवणुक पाहण्याकरीता शहरातील आणि जवळपासच्या गावातील महिला—पुरूष, मुले मुली मोठया संख्येने येत असतात. सदर ठिकाणी गणेश भक्तांना कोणताही त्रास होवु नये तसेच शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहुन, सदरची गणेश विसर्जन मिरवणुक संपुर्ण शांततेत व भक्तीमय भावनेत पार पाडण्याकरीता चंद्रपुर जिल्हा पोलीसांनी पोलीस अधीक्षक, चंद्रपुर डॉ.श्री. महेश्वर रेड्डी यांचे मार्गदर्शनात, अपर पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. प्रशांत खैरे यांचे नेतृत्वात अत्याधुनीक उपकरणाच्या साहयायाने जयत तयारी करण्यात आली आहे.

यामध्ये शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे आणि हॅन्डीकॅमेराद्वारे संपुर्ण मिरवणुकीदरम्यान बारकाईने नजर ठेवण्यात येणार आहे. तसेच महत्वाच्या ठिकाणी ड्रोन कॅमेराद्वारे निगराणी ठेवण्यात येणार आहे.

संपुर्ण बंदोबस्ताकरीता ०१ अपर पोलीस अधीक्षक, ०५ पोलीस उपअधीक्षक, ११ पोलीस निरिक्षक, ५० सपोनि/पोउपनि, पुरूष पोलीस कर्मचारी ५५४, महिला पोलीस कर्मचारी ११५, पुरूष होमगार्ड ९२, महिला होमगार्ड ४०, दंगा नियंत्रण पथक, नक्षल विरोधी अभियान पथक, अति जलद प्रतिसाद पथक, ०१ एसआरपीएफ प्लाटुन नेमण्यात आला आहे. मिरवणुक मार्गावर मुख्य ठिकाणी पोलीसांनी वॉच टॉवर व पोलीस मदत केंद्र उभारले असून बॅनर्स व पोस्टरद्वारे नागरीकांना महत्वाच्या सुचना दिल्या आहेत. सोबतच पोलीस मित्रांसह विविध एनजीओचे स्वयंसेवक सहभाग घेणार आहे.

तरी चंद्रपुर पोलीसांद्वारे आवाहन करण्यात येते की, नागरीकांनी सोशल मिडियावर पसरविल्या जाणाऱ्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवु नये. तात्काळ जवळचे पोलीस स्टेशन किंवा पोलीस नियंत्रण कक्ष येथे संपर्क करावा. तसेच मिरवणुकीदरम्यान ध्वनी प्रदुषण नियमांचे तंतोतंत पालन करून शांततेत व भक्तीमय भावनेत गणेश विसर्जन मिरवणुक पार पाडण्याकरीता पोलीस विभागास सहकार्य करावे.

———————————————————————————